# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २०/०४/२०२२

## <u>मा. महासभा</u>

मा. महासभा सुचना क्र. ०१

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. २९/०४/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

### मा. महासभा शुक्रवार दि. २९/०४/२०२२ सभा सुचना क्र. ०१ विषयपत्रिका

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| -- | **प्रश्नोत्तरे -** |
| -- | **मागील सभांचे इतिवृत्तांत -** |
| ०१ | दि. 01/10/2021, दि. 26/10/2021 (दि. 01/10/2021 रोजीची तहकुब सभा), दि. 26/10/2021, दि. 01/12/2021 व दि. 24/12/2021 (दि. 01/12/2021 रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| -- | सर्व निवडणूका - निरंक |
| -- | सर्व नियुक्त्या - निरंक |
| -- | मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स) - निरंक |
| -- | विनंती अर्ज - निरंक |
| -- | स्थायी परिवहन व विशेष समित्यांचे ठराव - |
| ०२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बालसंरक्षक समित्या स्थापन करणेबाबत. |
| ०३ | महापालिका शाळांमध्ये ९ वी चे वर्ग सुरु करणेबाबत. |
| ०४ | महापालिका शाळांमध्ये सेमी इंग्लिश वर्ग सुरु करणे. |
| ०५ | संपूर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यास कर भरणा रक्कमेवर सुट देणेबाबत. |
| ०६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांना इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थेतील नागरीकांना / गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातून सुट किंवा परतावा देण्याबाबत. |
| ०७ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी नविन इलेक्ट्रीक बस खरेदी करणे व बस सेवेसाठी बस ऑपरेटर नियुक्त करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| ०८ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. 230 रामदेव पार्क येथे बांधण्यात आलेले मेडीटेशन सेंटर चा वापर सुरु करणेसाठी भाडे ठरविणेबाबत. |
| ०९ | मिरा भाईंदर शहरासाठी क्लस्टर योजना राबविणेकामी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत. |
| १० | राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना तसेच गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना आर्थिक सहाय्य करणेबाबत. |
| ११ | मनपा मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई कामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणे कामाची निविदा मागविणेबाबत. |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात पडणारे खड्डे Jet Patcher Pothole Patching Machine द्वारे बुजविणे कामाबाबत. |
| १३ | रस्ते, चौक, वास्तु यांना नावे देणेबाबत. |
| १४ | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी देणेबाबत. |
| १५ | जेष्ठ विरंगुळा केंद्रातील मासीक अनुदानात वाढ करणे. |
| १६ | महानगरपालिका हद्दीतील बेवारस पशु, पक्षी, जनावरे यांचे दफनासाठी जागा निश्चित करणे. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २० एप्रिल २०२२

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२१/४/2022**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. ०२ :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बाल संरक्षण समित्या स्थापन करणेबाबत....**

**संदर्भ:- 1) जा.क्र.जिमबाविअ/अर्धशाप/2021-22/बासंस/ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, दि.26/07/2021 रोजीचे पत्र.**

**2) महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.ICPS-2014/ प्र.क्र.23 / का-8 दि.29/03/2014**

**3) महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.ICPS-2014/ प्र.क्र.23 / का-8 दि.10/06/2014.**

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. 1 व 2 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये लोकप्रतिनिधी यांच्या अध्यक्षतेखाली बाल संरक्षण समित्या स्थापन करणेबाबत निर्देश दिलेले असुन सदर समितीमार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2000 (2006 व 2015) तसेच बालकांविषयी इतर सर्व कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबतच्या सुचना देण्यात आलेले आहेत.

तसेच मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचे संदर्भिय पत्र क्र. 1 मध्ये नमुद शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये बाल संरक्षण समिती स्थापन करणेबाबतची कार्यपध्दती विषद केलेली आहे.

**1) प्रत्येक नगरसेवक यांचे अध्यक्षतेखाली बाल संरक्षण समिती (नगरपालिका तसेच महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रात) :**

**रचना:**

1) नगर सेवक / नगर सेविका - अध्यक्ष 1
2) वय वर्ष 12 ते 18 या वयोगटातील मुलगा प्रतिनिधी - सदस्य 1
3) वय वर्ष 12 ते 18 या वयोगटातील मुलगी प्रतिनिधी - सदस्य 1
4) प्राथमिक / माध्यमिक (अनुदानीत) शाळेत मुख्यधापक अथवा शिक्षक (शिक्षणाधिकारी द्वारा नियुक्त ) - सदस्य 1
5) पोलिस स्टेशनमधील नियुक्त बाल संरक्षण अधिकारी - सदस्य 1

6) स्थानिक सामाजिक संस्था प्रतिनिधी - सदस्य 2

7) अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती (महानगरपालिका शाळा) - सदस्य 1 (शिक्षणाधिकारी व्दारा नियुक्त)

8) महानगरपालिकेच्या प्राथमिक / माध्यमिक (अनुदानित) शाळेचे मुख्याध्यापक अथवा शिक्षक - सदस्य 1 (शिक्षणाधिकारी व्दारा नियुक्त)

9) वैद्यकीय अधिकारी (शासकीय / खाजगी) - सदस्य 1 (समितीव्दारा निवड केलेला / केलेली)

10) अंगणवाडी पर्यवेक्षिका / मुख्यसेविका - सदस्य सचिव

सदरच्या बाल संरक्षण समितीच्या आस्थापनेबाबतचा ठराव प्रभाग समितीच्या बैठकीत घ्यावा. तसेच सदर समितीत जास्तीत जास्त महिला सभासद असतील याची खातरजमा करावी.

**2) नगर बाल संरक्षण समितीची कार्ये :**

अ. **प्रतिबंधात्मक कार्ये :**

**समस्या शोध**

1) प्रभागामध्ये काळजी व संरक्षण तसेच विधीसंघर्षग्रस्त असणा-या बालकांना तसेच त्याला कारणीभुत असणा-या घटकांचा, समस्यांचा शोध घेणे तसेच जिल्हा बाल संरक्षणामध्ये दिलेल्या नियोजन नमुना आराखड्यामध्ये बाल संरक्षण बाबींवर वार्षिक नियोजन करणे.

2) बाल संरक्षण, बाल हक्क व बालकांचा सहभाग इ. विषयांबाबत प्रभाग स्तरावर जाणीव जागृती करुन या विषयांना प्रभाग व वार्डाच्या अर्थसंकल्पामध्ये, नियोजनामध्ये व प्रशासकीय कामामध्ये प्राथमिकता देणे व त्याबाबत आर्थिक तरतुद करणे.

3) बालकांना तसेच त्यांच्या कुटुबांला आधार मिळेल अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, जिल्हा नियोजन समितीच्या विविध योजनांचा, स्त्रोतांचा शोध घेणे. तसेच सदरच्या योजनांचा लाभ बालक कुटुंबापर्यंत मिळवुन देणे.

**3) योजनांचे एकत्रिकरण व समन्वय** :

1) काळजी व संरक्षणाची गरज असणा-या तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना तसेच त्यांच्या कुटूंबांना अन्न, वस्त्र, निवारा, सामाजिक सुरक्षा, वैद्यकीय सुविधा, निर्वाहाच्या सोयी, तसेच शिक्षण , इत्यादी बाबतच्या शासकीय योजनांचा एकत्रित लाभ देणे व त्याबाबत समन्वय साधणे.

2) काळजी व संरक्षणाची गरज असणा-या तसेच विधीसंघर्षग्रस्त बालकांना त्यासंबंधित प्रकरणे हाताळणारी सक्षम प्राधिकरणे उदा.बाल कल्याण समिती /बाल न्याय मंडळ आणि जिल्हा बाल संरक्षण कक्ष, इत्यादीशी समन्वय साधणे.

**4) बालक,तरुण तसेच प्रौढ इत्यादीच्या सहभागासाठी प्रोत्साहन व सहाय्य:-**

बालकांच्या दृष्टीकोनातुन त्यांच्या राहणीमानावर परिणाम करणा-या बाबींबाबत त्यांना निर्णय घेण्याकरीता पाठिंबा तसेच प्रोत्साहन देणे तसेच त्याच्या निर्णयांचा आदर करणे. बालकांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या सर्व बाबीवर निर्णय घेताना बालकांच्या सहभाग आवर्जुन घेणे तसेच त्यांच्या मतांचा आदर करणे. उदा. ग्रामसभा, ग्राम पंचायत, प्राथमिक आरोग्य शाळा इ.

**ब. उपाय योजनात्मक कार्य:-**

- **बालकासंबंधातील विविध प्रकरणे ओळखुन त्यांमध्ये मध्यस्थी तसेच सहाय्य करुन त्या प्रकरणांचे निवारण करणे:-**
  1) बाल संरक्षण संदर्भातील विविध समस्या उदा. शारीरीक किंवा लैंगिक अत्याचार, हिंसात्मक कृत्ये तसेच बालकांचे शोषण निवारणा संदर्भात महत्वाची भुमिका बजावणे.
  2) बालकांवर परिणाम करणा-या विविध समस्या संदर्भात उदा.बाल विवाह,बाल कामगार,अनैतिक व्यापार,बालकांचे लैगिंक शोषण इ. प्रतिबंधात्मक तसेच उपचारात्मक उपाययोजना करणे.
  3) बालकांसदर्भात घडणा-या अत्याचाराच्या तसेच शोषणाच्या घटनांवर कायदेशिर कार्यवाही करणे.
  4) पिडीत बालकास समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे.

- **बाल संरक्षण समितीचा कालावधी**
  1) नगरसेवक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित झाल्यापासुन 5 वर्षासाठी कार्यरत राहतील.
  2) एखादया सदस्याने राजीनामा दिल्यास त्या व्यक्तीच्या जागी दुस-या सदस्याची नेमणुक संबंधितांसोबत चर्चा करुन करण्यात येईल.

- **बाल संरक्षण समितीच्या बैठका**

1) बाल संरक्षण समिती महिन्यातुन किमान 1 वेळा (आवश्यकता भासल्यास अधिक वेळा) बैठक आयोजित करतील.

2) सदर बैठका शाळेच्या जागेत किंवा प्रभाग कार्यालयात आयोजित करण्यात येईल.

नगर बाल संरक्षण समितीने, जिल्हा बाल संरक्षण एकक (DCPU) यांचे कडे अहवाल सादर करावा. तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष अमंलबजावणी संदर्भात वेळोवेळी कार्यशाळा घेऊन समितीच्या सदस्यांना मार्गदर्शन करतील. सदरच्या कार्याशाळांना उपस्थित राहणे सर्व सबंधित सदस्यांना बंधनकारक आहे. शिवाय संबंधित समित्यांनी त्यांच्या कार्याचा अहवाल जिल्हा बाल संरक्षण कक्षास सादर करावा. मा.महासभेची मान्यता प्राप्त झालेनंतर सदरच्या बाल संरक्षण समितीच्या आस्थापनेबाबतचा ठराव प्रभाग समितीच्या बैठकीत घ्यावा. तसेच सदर समितीत जास्तीत जास्त महिला सभासद असतील त्याची खातरजमा करावी. याबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही प्रभाग समितीचे सहा. आयुक्त यांचे स्तरावर करणेस मान्यता असावी. तसेच प्रभागनिहाय समितीने वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सहा. आयुक्त यांचे मार्फत उपायुक्त (महिला व बालकल्याण विभाग) यांचेकडे सादर करण्यात यावा.

उपरोक्त अनुक्रमांक 1 मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रत्येक नगरसेवक यांचे अध्यक्षतेखाली बाल संरक्षण समिती स्थापन करणेबाबत मा. महासभेची मान्यता व्हावी.

**(मा. आयुक्त यांचे मान्यतेने)**

**(संजय शिंदे)**
**उपायुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ३१/०३/२०२२ दु १२:२४ वा
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ...... ०५ ..... वर्ष :- २०२१-22

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२९/४ /२०२२

## गोषवारा

**प्रकरण क्र. :- ०३ मनपा शाळांमध्ये ९ वीचे वर्ग सुरु करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकुण ३६ शाळा आहेत. त्यापैकी मराठी २१, उर्दु ५, गुजराती ५ व हिंदी ५ अशा माध्यमनिहाय ३६ शाळा आहेत. ३६ शाळांपैकी ८ वी चा वर्ग असलेल्या ०४ उर्दु माध्यमांच्या शाळा, ०४ मराठी माध्यमांच्या अशा ८ शाळा आहेत. त्यांची पटसंख्या खालीलप्रमाणे :-

| क्र. | शाळेचे नाव | इयत्ता | माध्यम | मुख्याध्यापक व शिक्षक संख्या | इ. ८ वी ची पटसंख्या | शाळेची एकुण पटसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा शाळा क्र.०४ काशी | १ ली ते ८ वी | मराठी | १ + १६ = १७ | १३८ | ११४७ |
| २ | मनपा शाळा क्र.१० चेणे | १ ली ते ८ वी | मराठी | १ + ६ = ७ | २२ | २१३ |
| ३ | मनपा शाळा क्र.१४ पेणकरपाडा | १ ली ते ८ वी | मराठी | ० + ८ = ८ | ५० | ३१८ |
| ४ | मनपा शाळा क्र.१९ माशाचा पाडा | १ ली ते ८ वी | मराठी | १ + ५ = ६ | ४० | ४०० |
| ५ | मनपा शाळा क्र.०५ काशी | १ ली ते ८ वी | उर्दु | १ + ३ = ४ | ५७ | ३६१ |
| ६ | मनपा शाळा क्र.३१ भाईंदर प | १ ली ते ८ वी | उर्दु | १ + २ = ३ | ३८ | १९१ |
| ७ | मनपा शाळा क्र.३२ मिरेगाव | १ ली ते ८ वी | उर्दु | १ + २ = ३ | २७ | २५९ |
| ८ | मनपा शाळा क्र.३४ मिरा रोड | १ ली ते ८ वी | उर्दु | १ + ४ = ५ | ४७ | २९६ |

वरील शाळांपैकी मनपा शाळा क्र.०४ काशी, मनपा शाळा क्र.१९ माशाचा पाडा व मनपा शाळा क्र.१४ पेणकरपाडा येथे मराठी माध्यमांचे इ. ९ वी चे वर्ग सुरु करण्यात येऊ शकतात तसेच मनपा शाळा क्र.३४ मिरा रोड येथे उर्दु माध्यमांचे इ. ९ वी चे वर्ग सुरु करण्यात येऊ शकतात.

शासन निर्णय दि.११ जुन, २००९ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषद/जिल्हा परिषदा) पोलीस वेल्फेअर, आर्मी वेल्फेअर यांच्यामार्फत स्वत:च्या आर्थिक उत्पन्नातुन व शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न येता माध्यमिक शाळा सुरु करावयाचे असल्यास त्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकरिता लागु असणारी कार्यपद्धती यापुढे लागु राहणार नाही. त्यामुळे माध्यमिक शाळा सुरु करावयाचे असल्यास त्याकरिता चलन भरुन प्रस्ताव दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्याठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषद/जिल्हा परिषदा) पोलीस वेल्फेअर, आर्मी वेल्फेअर यांच्या प्राथमिक शाळा सुरु आहे तेथे अथवा स्वतंत्र माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळेचे वर्ग स्वत:च्या उत्पन्नातुन व राज्य शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व न येता सुरु करण्यास इच्छित असतील तर असे इ. ८ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्यास यापुढे शासन

स्तरावरुन राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार येणार नाही या अटीच्या अधीन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

१) त्या अनुषंगाने सदयस्थितीत मिरा भाईंदर मनपाच्या शाळेत इ. ८ वी चा वर्ग असणाऱ्या एकुण ८ शाळेमध्ये वरील प्रमाणे शिक्षक संख्या कार्यरत आहेत. इ. ९ वी चा वर्ग सुरु करण्यासाठी अधिक शिक्षकांची आवश्यकता आहे. तसेच वर्ग खोल्याची देखील आवश्यकता आहे.

२) इ. ९ वीतील विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी शिक्षकांची शैक्षणिक पात्रता ही बी. ए. बी. एड, बी. एस. सी. बी. एड शिक्षण पुर्ण केलेले असावे. तसेच विज्ञान प्रयोग शाळा, लिपिक कर्मचारी, शिपाई कर्मचारी यांची आवश्यकता आहे. सदयस्थितीत मनपामध्ये वरील शैक्षणिक पात्रता असणारे शिक्षक खुप कमी उपलब्ध आहेत.

३) मनपा शाळेमध्ये जे शिक्षक बी. एड पदवीधारक आहेत अशा शिक्षकांना इ. ९ वी च्या वर्गावर अध्यापनासाठी घेता येईल तसेच होणाऱ्या रिक्त जागांवर ठोक मानधनावर घेतले जाणारे शिक्षक प्राथमिक शाळांसाठी घेता येईल.

४) इयत्ता ९ वी चे वर्ग सुरु करण्यासाठी पुढील विषयसुचीनुसार व गुणांच्या विभागणीनुसार अध्ययन अध्यापन करण्यात येईल.

**इयत्ता ९ वी (विषय)**

| | |
|---|---|
| १ | प्रथम भाषा- मराठी (८० + २०) |
| २ | व्दितीय भाषा- हिंदी (हिंदी संयुक्त + संस्कृत) |
| ३ | तृतीय भाषा- इंग्रजी ८० + २० |
| ४ | बिजगणित – I ४० + १० |
| ५ | भुमिती – II ४० + १० |
| ६ | विज्ञान- I ४० + १० |
| ७ | विज्ञान- II ४० + १० |
| ८ | इतिहास ४० + १० |
| ९ | भूगोल ४० + १० |
| १० | पि. टी. – १०० गुण |
| ११ | स्काऊट गाईड/संरक्षणशास्त्र - १०० गुण |
| १२ | जलसुरक्षा – १०० गुण |

५) समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठयपुस्तक योजनेचा लाभ इ. १ ली ते ८ वी तील विद्यार्थ्यांना लाभ दरवर्षी मिळत असतो. परंतु इ. ९ वी तील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. पाठयपुस्तकांचा खर्च महानगरपालिकेला करावा लागेल त्याकरिता अंदाजे रु.१,५०,०००/- खर्च येईल.

६) इ.९ वी चे मराठी माध्यमांचे ०३ व उर्दु माध्यमांचा ०१ वर्ग सुरु करण्यास ०८ शिक्षकांची आवश्यकता आहे. शासनामार्फत सदयस्थितीत शिक्षक देता येणार नाही. ठोक वेतनावर विषयनिहाय शिक्षकांची आवश्यकता आहे. ठोक वेतनावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना रु.१५०००/- ते २०,०००/- च्या ठोक मानधन तत्वावर ६ महिन्याच्या करार पद्धतीने नेमण्यात आल्यास मनपाचा आर्थिक खर्च वाढेल. तसेच काही दिवसांनी सदर शिक्षक हे समान काम समान वेतनाची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु सदर शिक्षक हे मानधनावर घेतल्यास त्यांना ठराविक कालावधीत सेवाखंड देणे आवश्यक राहील. तसेच संबंधित

शिक्षकांकडुन कायमस्वरुपी ठेक्यावर काम करणेस व इतर कोणताही लाभ मागता येणार नाही असे हमीपत्र घेणे आवश्यक राहील.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दिनांक ११/१२/२०१३ च्या ठरावाने मनपा शाळांना जुन २०१४ पासून इ. ८ वी ते १० वी पर्यंत माध्यमिक शाळा मराठी,हिंदी, उर्दु व गुजराती माध्यमांच्या शाळा/वर्ग तातडीने सुरु करण्यात यावे असे पारित करण्यात आले आहे. त्यानुसार इ. ८ वी चा वर्ग सुरु झाला असुन इ. ९ वी चा वर्ग सुरु करण्यात यावा. नियमानुसार मनपा शाळांमध्ये ९ वीचे वर्ग सुरु करणेबाबत मनपा शाळांमध्ये ९ वीचे वर्ग सुरु करणेबाबत महासभेची मान्यता असल्याने इ. ९ वी चा वर्ग सुरु करण्याबाबत खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

सदयस्थितीत पुढील शैक्षणिक वर्षात इयत्ता ९ वी करिता अध्यापन करावयाचे असल्यास ठोक मानधनावरील शिक्षक नेमण्यास एका महिन्याला एका शिक्षकाला २०,०००/- रुपये ठोक वेतन त्यानुसार ०८ शिक्षकांसाठी महिन्याला १,६०,०००/- खर्च होईल तर वर्षाला १६,००,०००/- इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

शासनाकडुन सदरचे अनुदान मिळणार नाही महापालिकेला याचा खर्च करावा लागेल त्याअनुषंगाने इ. ९ वी चा मराठीचे ०३ वर्ग व उर्दुचा ०१ वर्ग सुरु करण्याबाबत दि.११/१२/२०१३ रोजीच्या मा. महासभेत मंजुर ठरावानुसार शासनाच्या मान्यतेसाठी मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडे प्रस्ताव सादर केला जाईल.

या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात येते की, मनपा शाळा क्र.०४ काशी, मनपा शाळा क्र.१९ माशाचा पाडा व मनपा शाळा क्र.१४ पेणकरपाडा येथे मराठी माध्यमांचे इ. ९ वी चे वर्ग सुरु करण्यात येऊ शकतात तसेच मनपा शाळा क्र.३४ मिरा रोड येथे उर्दु माध्यमांचे इ. ९ वी चे वर्ग सुरु करण्याच्या अनुषंगाने नैसर्गिक न्याय वाढ तत्वानुसार प्रस्ताव मा. शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्या मान्यतेकरिता सादर करण्यास मान्यता असावी. तसेच मनपा शाळांमध्ये A.V.Room/डिजिटल क्लासरुम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण सुरु करणे गरजेचे आहे. मनपा शाळांमध्ये A.V.Room/डिजिटल क्लासरुम तयार करुन E-Learning द्वारे शिक्षण सुरु करणेस मान्यता असावी.

तरी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये ९ वी चे वर्ग सुरु करणेस व ठोक मानधनावर शिक्षकांच्या नियुक्ती करणेसाठी महासभेची मंजुरी मिळणेस गोषवारा सादर.

मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने

(डॉ.संभाजी पानपट्टे)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२९/ ४ /२०२२

## गोषवारा

**प्रकरण क्र.:- ०४ मनपा शाळांमध्ये सेमी इंग्लिश वर्ग सुरु करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपणांस सादर करते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात एकुण ३६ शाळा आहेत. त्यापैकी मराठी २१, उर्दु ५, गुजराती ५ व हिंदी ५ अशा माध्यमनिहाय ३६ शाळा आहेत. त्यांची पटसंख्या खालीलप्रमाणे :-

| अनु.क्र. | इयत्ता | पटसंख्या |
|---|---|---|
| १ | १ ली | ७६४ |
| २ | २री | ७६२ |
| ३ | ३ री | १०८१ |
| ४ | ४ थी | १०७१ |
| ५ | ५ वी | १०४२ |
| ६ | ६ वी | १०४६ |
| ७ | ७ वी | १०६३ |
| ८ | ८ वी | ४१९ |
| | एकुण | ७२४८ |

१) त्या अनुषंगाने सदयस्थितीत मिरा भाईंदर मनपाच्या शाळेत इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांकरिता गणित हा विषय सेमी इंग्लिश मध्ये शिकविला जातो. परंतु विज्ञान हा विषय मराठी भाषेतच अध्ययन अध्यापन केला जातो.

२) इ. ५ वी ते ८ वीतील विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून गणित हा विषय शिकविला जातो. परंतु इ. ५ वीतील विदयार्थी हे व्दिधा परिस्थितीत गोंधळलेल्या अवस्थेत असतात. ही एक समस्या शिक्षक व विदयार्थ्यांसमोर आहे.

३) सेमी इंग्लिश शाळेकरिता शिक्षकांची शैक्षणिक पात्रता ही १२ वी सायन्स D.ed, BSC D.ed व B.ed किंवा कॉन्व्हेन्ट स्कुलमध्ये शिक्षण पुर्ण केलेले असावे. सदयस्थितीत मनपामध्ये वरील शैक्षणिक पात्रता असणारे शिक्षक खुप कमी उपलब्ध आहेत.

४) सेमी इंग्रजी करीता ठोक वेतनावर १ ली ते ३ री करीता ३६ शिक्षकांची आवश्यकता आहे. ठोक वेतनावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना रु.१५०००/- ते २०,०००/- च्या ठोक मानधन तत्वावर ११ महिन्याच्या करार पद्धतीने नेमण्यात आल्यास मनपाचा आर्थिक खर्च वाढेल. तसेच काही दिवसांची सदर शिक्षक हे समान काम समान वेतनाची मागणी करण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु सदर शिक्षक हे मानधनावर घेतल्यास त्यांना ठराविक कालावधीत सेवाखंड देणे आवश्यक राहील. तसेच संबंधित शिक्षकांकडुन कायमस्वरुपी ठेक्यावर काम करणेस व इतर कोणतेही लाभ मागता येणार नाही असे हमीपत्र घेणे आवश्यक राहील. इयत्ता ३ री करिता मानधनावरील शिक्षक नेमण्यास एका महिन्याला एका शिक्षकाला रु.२०,०००/- ठोक वेतन त्यानुसार ३६ शिक्षकांसाठी महिन्याला ७,२०,०००/-होईल तर ११ महिन्यांकरिता ७९,२०,०००/- इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

५) मनपा शाळेमध्ये इ. १ ली ते ४ थी करिता गणित विषय इंग्रजीमधुन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून शिकविला जात आहे. परंतु विज्ञान विषय हा इयत्ता ३ री पासून सुरु होत असुन सदर विषय मराठीतुनच शिकविला जातो. सेमी इंग्रजी पुर्णपणे सुरु करायचे झाल्यास प्रथमतः येणाऱ्या सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ३ री करीता विज्ञान (परिसर अभ्यास)

हा विषय इंग्रजी मधून सुरु करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपलब्ध शिक्षकांमधून तसेच ठोक वेतनावर काही शिक्षक नेमुन विज्ञान विषय इंग्रजीमधून शिकविण्यासाठी प्रस्तावित करण्यात यावे. त्याप्रमाणे पाठयपुस्तकांची मागणी करताना इयत्ता ३ री विज्ञान करीता इंग्रजीमधून पाठयपुस्तकांची मागणी करणे आवश्यक आहे.

६) तद्नंतर २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ४ थी करीता विज्ञान विषयाचे अध्ययन इंग्रजी माध्यमातुन करणे संयुक्तीत होईल. तद्नंतर त्यापुढील शैक्षणिक वर्षात म्हणजेच सन २०२४-२५ मध्ये ५ वी, सन २०२५-२६ मध्ये ६ वी, सन २०२६-२७ मध्ये ७ वी व सन २०२७-२८ मध्ये ८ वी या क्रमाने सेमी इंग्रजी माध्यम सुरु करता येणे शक्य आहे.

७) सेमी इंग्लिश करीता विषयावर सुची पुढील प्रमाणे-

| क्र. | इयत्ता | माध्यम | विषय | |
|---|---|---|---|---|
| | | | गणित | विज्ञान |
| १ | १ ली | सेमी इंग्रजी | गणित | -- |
| २ | २ री | सेमी इंग्रजी | गणित | -- |
| ३ | ३ री | सेमी इंग्रजी | गणित | परिसर अभ्यास Enviormental Studies |
| ४ | ४ थी | सेमी इंग्रजी | गणित | परिसर भाग-१ (Enviormental Studies- Part 1) |
| | | | | परिसर भाग-२ (Shivachhatrapati- Part 2) |
| ५ | ५ वी | सेमी इंग्रजी | गणित | परिसर भाग-१ (Enviormental Studies- Part 1) |
| | | | | परिसर भाग-२ (How we come to be - Part 2) |
| ६ | ६ वी | सेमी इंग्रजी | गणित | विज्ञान (General Science) |
| ७ | ७ वी | सेमी इंग्रजी | गणित | विज्ञान (General Science) |
| ८ | ८ वी | सेमी इंग्रजी | गणित | विज्ञान (General Science) |

८) सदयस्थितीत मनपा शाळांमध्ये पुढील विषयसुची व माध्यमानुसार अध्ययन अध्यापन केले जाते.

| क्र. | इयत्ता | विषय | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | गणित | माध्यम | विज्ञान | माध्यम |
| १ | १ ली | गणित | सेमी इंग्रजी | -- | -- |
| २ | २ री | गणित | सेमी इंग्रजी | -- | -- |
| ३ | ३ री | गणित | सेमी इंग्रजी | परिसर अभ्यास | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| ४ | ४ थी | गणित | सेमी इंग्रजी | परिसर भाग-१ | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| | | | | परिसर भाग-२ | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| ५ | ५ वी | गणित | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु | परिसर भाग-१ | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| | | | | परिसर भाग-२ | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| ६ | ६ वी | गणित | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु | विज्ञान | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| ७ | ७ वी | गणित | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु | विज्ञान | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |
| ८ | ८ वी | गणित | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु | विज्ञान | मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु |

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता प्रथम महानगरपालिकेच्या शिक्षकांमधून गणित व विज्ञान शिकविणाऱ्या जास्तीत जास्त शिक्षकांना इंग्रजीमधून अध्यापन करण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. तद्नंतर ठोक मानधनावरील शिक्षकांबाबत निर्णय घेणे उचित राहील.

३

सदयस्थितीत पुढील शैक्षणिक वर्षात इयत्ता ३ री करिता विज्ञान इंग्रजीमधुन अध्यापन करावयाचे असल्यास ठोक मानधनावरील शिक्षक नेमण्यास एका महिन्याला एका शिक्षकाला २०,०००/- रुपये ठोक वेतन त्यानुसार ३६ शिक्षकांसाठी महिन्याला ७,२०,०००/- खर्च होईल तर वर्षाला ८६,४०,०००/- इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे

या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात येते की, मनपा शाळा इ. १ ली ते ८ वी सेमी इंग्रजी माध्यमातून सुरु करण्याच्या अनुषंगाने १ ली ते ४ थी इयत्तेकरिता गणित विषय इंग्रजीमधून शिकविला जात असल्याने ( इ. १ ली, २ री करिता विज्ञान विषय अभ्यासक्रमात नाही) प्रथमतः या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ३ री करिता विज्ञान विषय (परिसर अभ्यास) इंग्रजीमधून अध्यापन सुरु करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर तद्नंतर त्याप्रमाणे त्यापुढील शैक्षणिक वर्षापासून टप्याटप्याने अनुक्रमे ४ थी, ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी या वर्गांकरीता सेमी इंग्रजी सुरु करणे शक्य होईल. त्याप्रमाणात वर नमुद ठोक वेतनावर वरील शिक्षकांची संख्या वाढवून त्याप्रमाणे वाढीव खर्च अपेक्षित आहे.

तरी महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करणेस व ठोक मानधनावर शिक्षकांच्या नियुक्ती करणेसाठी महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस गोषवारा सादर.

मा. आयुक्त सो., यांचे मान्यतेने

(डॉ.संभाजी पानपट्टे)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २१/ ४ /२०२२

## गोषवारा

प्रकरण क्र. ०५ :- संपुर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यास कर भरणा रक्कमेवर सुट देणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विविध विकासकामे तसेच महापालिकेची आवश्यक कर्तव्ये बजाविणेकरीता होणा-या खर्चाची तरतुद करण्याकरीता मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थिती मध्ये एकुण ३.६७ लाख इतक्या मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आलेली आहे. या कर आकाणी झालेल्या मालमत्तांची एकुण मागणी मालमत्ता २८४ कोटी आहे. पैकी चालु मागणी १५२.६९ कोटी आहे.

मालमत्ता कराची मागणी देयक बजाविले नंतर मालमत्ता कराचा भरणा करणेकरीता अधिनियमान्वये विहित मुदत देण्यात येते. सदर विहित मुदतीत कराचा भरणा न करणा-या मालमत्ता धारक यांना देयक बजावल्यानंतर अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम चे कलम ४१ नुसार शास्तीची आकारणी करण्यात येते.

तथापी, मालमत्ता कराचा नियमीत व विहित मुदतीत कराचा भरणा करणा-या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी आगाऊ कर भरणा-या मालमत्ता धारकांसाठी सवलत देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मध्ये पुढील तरतुद आहे. " या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र मालमत्ता असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आगाऊ आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या भरण्यातून वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील."

उक्त कलमान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारक यांनी मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर बिलात विनिर्दिष्टीत केलेल्या दिनांकापुर्वी संपुर्ण वर्षाकरीता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यास मालमत्ता करा मध्ये खालील तक्त्याप्रमाणे सवलत (सुट) देणे उचित वाटते.

| अ.क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी | मोबाईल अॅप / वेबसाईट चा वापर करुन मालमत्ता कराचे देयक डाऊनलोड करुन कर भरणा केल्यास |
|---|---|---|---|---|
| १ | ३१ मे पर्यंत | सामान्य कर (घरपट्टी) | ३% | ऑनलाईन कराचा भरणा केल्यास १% अतिरीक्त सुट<br>३ + १ = ४% |
| २ | ३० जुन पर्यंत | सामान्य कर (घरपट्टी) | २% | ऑनलाईन कराचा भरणा केल्यास १% अतिरीक्त सुट<br>२ + १ = ३% |

संपुर्ण मालमत्ता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यास वरील तक्त्याप्रमाणे सवलत / सुट दिल्यास मालमत्ता धारक यांचेकडुन मालमत्ता कर भरणा वेळेत करण्याकडे मालमत्ता धारकांचा कल वाढेल, त्यामुळे मालमत्ता कराचे उद्दीष्ट साध्य होण्यास मदत होईल.

२)

तसेच मोबाईल ॲप / वेबसाईटचा वापर करुन मालमत्ता कराचे देयक / बिल डाऊनलोड करुन ऑनलाईन कराचा भरणा करणा-या मालमत्ता धारकांना सामान्य करात (घरपट्टी) १% अतिरीक्त सुट दिल्यास मनपाचे मनुष्यबळ व आर्थिक खर्चात बचत होईल. तसेच विहित मुदतीत कर भरणा होणेंस मदत होईल.

सबब, आगाऊ मालमत्ता कर भरणा करणा-या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सवलत / सुट देणेकरीता मा. महासभेची मंजुरी मिळणेंस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि ०७/०४/२०२२ वेळ. दु.१२.११ वा
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ...09... वर्ष :- 2022-23

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. २९/४ /२०२२

## गोषवारा

प्रकरण क्र. ०६ :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता धारकांना इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना / गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक: एमयुएस-२०२१/प्र.क्र.१३४/नवि-१७ दि. २०/०८/२०२१

भारतात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे या वाहनांना चालविण्यासाठी इंधन शक्तीचा वापर खुप मोठ्याप्रमाणात होत आहे. स्वाभाविक इंधनाच्या अतिवापरामुळे या नैसर्गिक स्त्रोताचा नाश होत आहे व त्यापासून निघणाऱ्या धुरामुळे दिवसेंदिवस प्रदुषण वाढत आहे व वाढत्या प्रदुषणामुळे पर्यावरणाचा -हास होत आहे. संदर्भिय शासननिर्णय विचारात घेवून विद्युत शक्तीवर चालणाऱ्या वाहनांचा वापर केल्यास हवा प्रदुषण होणार नाही त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होईल.

इलेक्ट्रीक वाहनांचा वापर हा शाश्वत विकास ध्येयाच्या (Sustainable Development Goals) अंतर्गत (१) किफायतशीर व स्वच्छ ऊर्जा (Affordable and Clean Energy), (२) संसाधनाचा सुयोग वापर आणि निर्मिती (Responsible Consumption and Production) आणि (३) वातावरणीय बदलांना अनुरूप कृती (Climates Action) यांची उद्दीष्टये साध्य करण्याकरिता एक महत्त्वाचा घटक आहे. इलेक्ट्रीक वाहनांकरिता महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ मधील तरतूदीनुसार इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांनातील नागरिकांना / गृहनिर्माण संस्थाना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती त्यानुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडून पारित करण्यात आलेला शासन निर्णय खालीलप्रमाणे

शासन निर्णय क्रमांक: एमयुएस-२०२१/प्र.क्र.१३४/नवि-१७ नुसार इलेक्ट्रीक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांनातील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थाना महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ लागू असेपर्यंत:

(१) स्वतःच्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात 2% सूट देण्यात यावी. तथापि, रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकांने घ्यावी.

(२) गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात 5% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात यावी.

(३) गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा, मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळ्या जागेत केल्यास मात्र त्यामुळे आपत्कालीन कामाकरीता ती जागा अडचणीची असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापार कारण्याकरिता होणारा असला, तरी त्या जागेकरीता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता, ती घरगुती दराने करावी.

वरील शासन निर्णया नुसार शासनाने इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ निहीत केलेले आहे.

या बाबत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४०ब अन्वये परिस्थितीकीय दृष्ट्या लाभदायक योजनेची अमंलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करात सूट किंवा परतावा देण्याची तरतूद आहे. या कलमाच्या प्रयोजनार्थ परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजना" या शब्दप्रयोगात पावसाचे पाणी

(2)

साठविण्याची व्यवस्था, कृमी मिश्र खत, सौर ऊर्जेचा वापर आणि इतर अपारंपारिक ऊर्जास्त्रोत, सांडपाण्याचे पुनश्चकरण आणि पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि परिस्थितकीय लाभदायक गृहनिर्माण यांना चालना देणारी किंवा महानगरपालिका किंवा राज्य शासन यांनी निश्चित केलेली यासारखी कोणतीही योजना, या गोष्टींचा समावेश होतो.

सबब, उपरोक्त सर्व बाबीचा विचार होऊन महानगरपालिकेच्या हद्दीत इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/ गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेकरीता मा. महासभेची मंजुरी मिळणेंस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ०७/०४ /२०२२ वेळ- दु. १२.११ वा
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ....02.... वर्ष :- २०२२-23

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२८/४ /2022

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ०७** :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी नविन इलेक्ट्रीक बस खरेदी करणे व बस सेवेसाठी बस ऑपरेटर नियुक्त करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन 2005 पासुन परिवहन सेवा सुरू केली आहे. सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे JnNURM II अंतर्गत खरेदी केलेल्या 74 बसचा ताफा उपलब्ध आहे. त्यामध्ये टाटा स्टॅन्डर्ड 59 बस, टाटा मिडी-10 बस व वोल्वो 05 बसचा समावेश आहे.

सद्यस्थितीत उपलब्ध बसची संख्या अत्यंत कमी असल्याने व शहराची वाढती लोकसंख्या पाहता, वाढीव बसची आवश्यता असल्याने, 30 मिडी CNG बस महानगरपालिकेच्या फंडातून खरेदी करणेस मा. महासभा ठराव क्र.34 दि.02/09/2021 अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार दि.16/11/2021 रोजी निविदा प्रसिध्द करून दि.29/12/2021 पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

तसेच परिवहन सेवेचे नविन धोरण ठरविणेसाठी मा. महासभा ठराव क्र.11 दि.19/05/2021 अन्वये गठीत समितीची मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली दि.08/09/2021 रोजी बैठक घेऊन NCC with VGF तत्वावर परिवहन सेवा चालविणेसाठी 6 वर्षे कालावधीकरीता निविदा काढावी, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

उक्तप्रमाणे उपलब्ध 74 बस व नविन खरेदी करावयाच्या 30 बस असे 104 बसकरीता NCC with SMF or VGF तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणेकामी मा. महासभेच्या धोरणानुसार दि.22/10/2021 रोजी निविदा प्रसिध्द करून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र दरम्यानचे कालावधीमध्ये e-Bus खरेदी करणेकामी राज्य शासनाकडे 15 व्या वित्त आयोगातून अनुदान अपेक्षित आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण 2021" मध्ये सन 2025 पर्यंत सार्वजनिक वाहतूक 25% विद्युतीकरण करण्याचे लक्ष दिले आहे. त्यामुळे CNG 30 बस खरेदीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली आहे.

उक्त 30 नविन मिडी CNG बस खरेदीची प्रक्रिया रद्द केल्याने, उपलब्ध 74 बससाठी नव्याने बस ऑपरेटर नियुक्त करण्यासाठी दि.24/12/2021 रोजी निविदा प्रसिध्द करून प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. सदर निविदासाठी दोन मुदतवाढी अंती दि.21/02/2022 रोजी पर्यंत 02 (दोन) निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे सदरकामी दि.22/02/2022 रोजी फेरनिविदा प्रसिध्द करून दि.10/03/2022 पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीत दि.10/03/2022 पर्यंत 2 (दोनच) निविदा प्राप्त आहेत.

मात्र. 15 व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातून "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीच्या दि.28/01/2022 रोजीच्या बैठकी मध्ये रु.8.00 कोटी निधी इलेक्ट्रीक बस खरेदीसाठी वापरणेस मान्यता दिली आहे. मात्र सदर e-Buses राज्य शासनाचे Air Quality Monitoring

Committee ने National Clean Air Programme (NCAP) अंतर्गत e-Buses "Operational Cost Model (Wet Lease)" Basis वर, केंद्र शासनाचे Dept. of Heavy Industry चे दि.11/03/2019 ची अधिसुचना व दि.04/06/2019 guidelines [ (F.No. 6 (09)/2019 NAB. II (Auto) ] नुसार खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहराची वाढती लोकसंख्या, वाढीव बसेची गरज, शासनाचे इलेक्ट्रीक वाहन धोरण इत्यादी बाबी पाहता नविन बस खरेदी करतांना, इलेक्ट्रीक बस खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच सदर बस खरेदी करताना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना नुसार खरेदी कराव्या लागणार आहेत.

वरीलप्रमाणे सद्यस्थितीत उपलब्ध आलेल्या 74 बस चालविणेसाठी मा. महासभेच्या धोरणानुसार NCC with SMF or VGF तत्वावर 6 वर्षे कालावधीसाठी बस ऑपरेटर नियुक्त करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच नविन इलेक्ट्रीक बस देखील "Operational Cost Model (Wet Lease)" वर म्हणेजच बस ऑपरेटर / उत्पादक यांचेमार्फत खरेदी कराव्या लागणार आहेत. त्यासाठी 12 वर्षे कालावधीसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करावी लागेल.

सदर इलेक्ट्रीक बस खरेदी करताना "Operational Cost Model (Wet Lease)" पध्दतीने खरेदी करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. तसेच केंद्र शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार सदर बसेससाठी Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्तीच्या सुचना असून इतर महानगरपालिकेने Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटरमार्फत इलेक्ट्रीक बस खरेदी केल्या आहेत. यामध्ये केंद्र शासनाचे दि.04/06/2019 रोजीच्या मार्गदर्शक सुचनानुसार बस खरेदी बस ऑपरेटर यांचेमार्फत करून खरेदीसाठी केंद्र / राज्य शासनाचे अनुदानतून खालीलप्रमाणे Subsidy बस ऑपरेटर यांना देण्यात येते व बस खरेदीचा संपूर्ण खर्च बस ऑपरेटर यांचेमार्फत करण्यात येतो.

a. Standard Bus (lenth >10m to 12m) : 55 Lakhs
b. Midi Bus (lenth >08m to 10m) : 45 Lakhs
c. Mini Bus (lenth >06m to 08m) : 35 Lakhs

The entire subsidy amount will be released to STD for further payment to the selected bidder as per following installment.

| Installment No | The activity being completed | Percentage of demand incentive to be released by DHI |
|---|---|---|
| 1. | After the issue of supply order and signing of the agreement by STU with selected bidders; as mobilization advance | 20 % |
| 2. | Delivery of Buses | 40% |
| 3. | After 06 months of the successful commercial operation of Buses | 40% |

उक्तप्रमाणे मार्गदर्शक सुचना पाहता, सध्या इलेक्ट्रीक बस खरेदीसाठी 8.00 कोटी निधीतून 17 मिडी बस बस ऑपरेटर यांचेमार्फत खरेदी करता येतील.

उक्तप्रमाणे 74 बससाठी NCC with SMF or VGF तत्ववार व इलेक्ट्रीक बससाठी GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास दोन वेगळयाप्रकारे बस आपरेटर यांचेमार्फत बससेवा चालविताना बसमार्ग, तिकीटाचे उत्पन्न इत्यादी बाबत विवाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

तसेच, NCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करतांना Viability Gap Fund (VGF) देणे क्रमप्राप्त आहे. सदर तत्वावर बस चालवितांना बस ऑपरेटर यांचेकडून ज्या मार्गावर उत्पन्न जास्त आहे, अशाच मार्गावर बस चालविण्याचा कल असतो. तसेच NCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यानंतर भविष्यामध्ये बसची संख्या वाढ करावयाची झाल्यास व त्याच मार्गावर बसची संख्या व Frequency वाढ केल्यास उत्पन्न कमी होऊन बस ऑपरेटर यांचेकडून वाढीव VGF ची मागणी केली जाऊ शकते व त्यामुळे महानगरपालिका व बस ऑपरेटर यांचेमध्ये वाद निर्माण होऊ शकतो.

GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करतांना प्र.कि.मी. प्रमाणे निश्चित दर द्यावा लागतो. त्यामुळे बस ऑपरेटर यांना महानगरपालिकेने दिलेल्या Schedule नुसार बससेवा चालविणे बंधनकारक असते. बस तिकीटांपासून मिळणारे उत्पनांशी बस ऑपरेटर यांचा संबंध नसतो. त्यामुळे महानगरपालिकेच्या Schedule नुसार बससेवा सुरळीत चालविली जाते व नागरीकांना चांगली सेवा मिळू शकते. तसेच GCC तत्वावर बससेवा चालवितांना भविष्यामध्ये बसेसची संख्या व Frequency वाढ केल्यास बस ऑपरेटर यांचे कोणतेही नुकसान होत नसल्याने वाद निर्माण होण्याची शक्यता नसते. तसेच तिकीटाचे उत्पन्न ही बाब महानगरपालिकेशी संबंधित असल्याने त्यावर महानगरपालिका निर्णय घेण्यास सक्षम असते. मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे सद्यस्थितीत असलेल्या बसची संख्या अपुरी असून भविष्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात वाढीव बसची आवश्यकता आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी ESCBS (Efficient and Sustainable City Bus Service) प्रकल्पातंर्गत Ministry of Housing and Urban Affairs, GOI यांनी नियुक्त केलेले सल्लागार Centre of Excellence in Urban Transport CEPT Research and Development Foundation (CEPT University) यांनी तयार केलेल्या Service and Business Plan for City Bus Operations Report मध्ये 2030 पर्यंत 182 ते 369 बसची आवश्यकता असल्याचे नमुद केले आहे. तसेच सदर अहवालामध्ये त्यांनी सध्याचे NCC मॉडेल बससेवेमध्ये पुरेशी लवचिकता देऊ शकत नसल्याने GCC मॉडेलवर सुरूवात करण्याची सुचना केलेली आहे. तसेच Ministry of Urban Development (Urban Transport wing) यांचेकडील दि.21/04/2014 चे Advisory मध्ये देखील Urban Bus Operation साठी GCC मॉडेलची शिफारस केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे वस्तूस्थिती पाहता NCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास अडचणी उद्‌भवू शकतात. त्यामुळे नागरीकांना उत्तम बससेवा देण्यासाठी GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणे योग्य होईल. GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास बस चालविणेसाठी चालक नेमणे, बसेसची देखभाल दुरूस्ती व

इंधन वंगण इत्यादी जबाबदारी बस ऑपरेटर यांची असेल. तिकीट संकलन करणे, वाहक, प्रवर्तक, निरीक्षक व इतर कार्यालयीन कर्मचारी नेमणे इ. जबाबदारी महानगरपालिकेची असेल. तसेच तिकीटांचे उत्पन्न महानगरपालिकेकडे राहून प्रवासी कर/बालपोषण अधिभार शासनास भरण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असेल. GCC तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त केल्यास तिकीट दरवाढ, बसची संख्या वाढ व Frequency वाढ करणेसाठी महानगरपालिका निर्णय घेण्यास सक्षम असेल. तसेच GCC तत्वावर एकापेक्षा जास्त ऑपरेटर सद्याच्या 74 बस व नविन इलेक्ट्रीक बससाठी स्वतंत्र म्हणजेच डिझेल बससाठी वेगळा इलेक्ट्रीक बससाठी वेगळा असे बस ऑपरेटर नियुक्त करता येतील व बस ऑपरेटर वेगळे आले तरी, तिकीटोच उत्पन्न महानगरपालिकेमार्फत वसुल करण्यात येणार असल्याने, बस प्रवर्तन शेड्यूल महानगरपालिका करणार असल्याने कोणताही वाद न होता प्रवाशांना चांगली सेवा देता येईल.

तरी, NCC with SMF or VGF तत्ववार बस ऑपरेटर साठी कमी प्रतिसाद मिळत असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उपलब्ध 74 बस व नविन इलेक्ट्रीक बससाठी Gross Cost Contract (GCC) तत्वावर स्वतंत्र बस ऑपरेटर नियुक्त करणे, तिकीट संकलन/ पर्यवेक्षण, देखरेख इत्यादीसाठी स्वतंत्र एन्जसी नेमणेसाठी नव्याने धोरण निश्चित करून मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २८/०३/२०२२ दु.२:३९ वा
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नों
रजिस्टर अ. क्र ........ ........ वर्ष :- २०२१-२२

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२१/४ /2022**

**मिळकत विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक** (०८) :- मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.230 रामदेव पार्क येथे बांधण्यात आलेले मेडीटेशन सेंटर चा वापर सुरु करणेसाठी भाडे ठरविणे बाबत

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) रामदेव पार्क येथील मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र.230 मध्ये बुध्दविहार तसेच मेडीटेशन सेंटरची इमारत बांधण्यात आली आहे. सदर बुध्दविहार व मेडीटेशन सेंटर इमारतीचे दैनंदिन संचलन, देखभाल व दुरुस्तीसाठी देण्यासाठी विविध संस्थाचे अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत. सदर कामावर महानगरपालिकेने मोठया प्रमाणावर खर्च केला असुन सदर इमारतीच्या तसेच बुध्दविहाराच्या दैनंदिन साफसफाई, देखभाल व दुरुस्तीवर देखिल मोठया प्रमाणावर खर्च होणार आहे. सदर इमारत वापरासाठी खुली सुव्यवस्थित राहण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सदर इमारतीची दैनंदिन साफसफाई, देखभाल व दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी बांधण्यात आलेले बुध्दविहार सर्व धर्मातील नागरीकांसाठी खुले ठेवण्यात येईल. तसेच मेडीटेशन सेंटर इमारतीमध्ये वातानुकुलित यंत्रणा असल्याने सदर सभागृहाचे वातानुकुलित व विनावातानुकुलित अशा प्रकारे भाडे ठरविल्यास महानगरपालिकेस उत्पन्न मिळुन त्यामधुन देखभाल, दुरुस्ती व दैनंदिन साफसफाई वरील खर्च निघु शकणार आहे. तरी सदर इमारतीचे भाडे ठरवुन व वापराबाबत धारेण निश्चित करणेस शिफारस आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-6/22-23/DK/MG-1

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## भा. महासभा दि.२९/४ /2022

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ( ०९ ) :-** मिरा-भाईंदर शहरासाठी क्लस्टर योजना राबविणेकामी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. टीपीएस-1818/सीआर236/18 डीपी आणि आरपी /से.37(1एए) (सी) आणि (सी)से.20(4)/यूडी -13, दि.02 डिसेंबर 2020 रोजी अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र.14.8 अन्वये क्लस्टर योजना मंजूर करण्यात आलेली असून त्या अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींसाठी क्लस्टर योजना राबविणेचे योजिले आहे. क्लस्टर योजना राबविणे हे काम व्यापक, विस्तृत व तांत्रिक स्वरूपाचे असून सद्यस्थितीत मिरा-भाईंदर महानगरपालिकेती नगर रचना विभागाकडे विद्यमान मनुष्यबळाचे दैनंदिन कामकाज लक्षात घेता क्लस्टर योजना राबवण्यासाठी पुरेसा मनुष्यबळ उपलब्ध नाही. सदर बाबत खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिके तर्फे तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करून त्यांचेकडून क्लस्टर योजनेच्या अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे कामे करून घेणे आवश्यक आहे.

1. महापालिकेची आताची व प्रक्षेपीत लोकसंख्येबाबतचा अहवाल तयार करणे.
2. अर्थव्यवस्थेबाबत अहवाल तयार करणे.
3. पर्यावरण व पायाभुत सुविधांचा अहवाल तयार करणे.
4. सद्यस्थितीत नियोजन व सोई सुविधांचा अहवाल तयार करणे.
5. गृहनिर्माणबाबतची सद्यस्थितीचा अहवाल तयार करणे.
6. शहरातील सद्यस्थितीत FSI व TDR उपलब्धते बाबतचा अहवाल तयार करणे.
7. गृहनिर्माण क्षेत्रातील मागणी व पुरवठयाबाबत अहवाल तयार करणे.
8. नागरी पुर्न:रुत्थान नियमानुसार नियोजन करणे.
9. मागणी व पुरवठ्याबाबत तफावतीची कारणमिमांसा तयार करणे.
10. क्लस्टर योजनेची संकल्पना तयार करणे.
11. क्लस्टर योजनेची व्यवहार्यता तपासणे.
12. GIS base map तयार करणे.
13. GIS land map तयार करणे.
14. वाहतुक सर्व्हे करून विश्लेषण करणे.
15. टेक्नो फायनान्शीअल (Financial) अहवाल तयार करणे,
16. सविस्तर क्लस्टर प्लॅनचा आराखडा तयार करणे.

17. शासन स्तरावर योजनेचे सादरीकरण करुन त्यांच्याद्वारे उपस्थित मुद्दयांचे स्पष्टीकरण करुन योजनेला मान्यता देणे.

18. योजना कार्यान्वित केल्यानंतर त्याचा प्रचार, प्रसार व प्रबोधन करणे, सोशयो इकोनॉमिक सर्वेक्षण करुन त्याचे विश्लेषण करणे व CIMS सर्वे करुन जमा झालेली माहिती याची शास्त्रोक्त पद्धतीने संकलित करुन त्याचे विश्लेषण करणे.

वरील प्रमाणे प्रकल्पाची कामे सल्लागार नेमणूक करून ठाणे महानगरपालिका क्षेत्रात तसेच कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात राबिवण्यात आलेले असून त्यांनी निश्चित केलेल्या दराच्या आधारे मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील क्षेत्रात क्लस्टर योजना राबिवण्यासाठी सुमारे रूपये 1,50,00,000/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर सल्लागार नेमणूक ही 4 महिने कालावधी करिता राहील. त्यानुसार सल्लागार नेमणुकीसाठी ऑनलाईन जाहिर निविदा मागविण्याकरीता निविदा प्रपत्र तयार करण्यात आले आहे.

मिरा -भाईंदर महानगरपालिकेमध्ये क्लस्टर योजना राबविणे करीता तज्ञ सल्लागारांची नेमणूक करणे करीता निविदा काढणेस व निविदा प्रपत्रास मान्यता मिळणेस सादर. त्याप्रमाणे सदर कामाची तातडी विचारात घेता यासाठी 7 दिवसाची अल्पमुदतीची निविदा मागविणे आवश्यक वाटते.

सबब सर्वेक्षणाद्वारे संकलित माहितीच्या आधारे Cluster योजनेचे विस्तृत आराखडे तयार करणे व याकरीता टप्पा -2 CIMS, IES व Socio Economics Survey चे कामकाज पूर्ण करण्यासाठी आयुक्त यांना प्राधिकृत करणेस तसेच समूह विकास योजनेच्या सल्लागारांची नेमणूक नियुक्ती करणेच्या कामाकरीता रक्कम रूपये 1,50,00,000/- (एक कोटी पन्नास लाख) च्या खर्चास व सदर कमाची निकड पाहता सदरचे काम अल्पमुदतीची जाहिर सुचनेद्वारे स्पर्धात्मक देकार मागविण्यास व सदर कामासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्यास प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यास अनुमतीस्तव सादर.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 29/2/2022 वेळ 90:30 (?)
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. ६e वर्ष :- 2022/22

नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्यकार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे 401101
सभा दि.२९/ ६ /2022

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रं.१० :- राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तसेच नोंदणीकृत संस्थेमार्फत (असोसिएशन) मार्फत भरविण्यात येणाऱ्या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना तसेच गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना आर्थिक सहाय्य् करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खेळांडूनी राज्य् तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करुन पदक विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी महानगरपालिकेमार्फत "महापौर चषक" सारख्या स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळाडूच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभूत सुविधा, खेळाडूचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अदयावत तंत्रज्ञानाची ओळख या बाबी विचारात घेवुन संदर्भ क्रं.2 नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. राज्यातील खेळाडूंना अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे सतचे अत्यकृष्ट कामगिरी दाविण्यासाठी आर्थिक सहाय्य् करण्याच्या सुचना सदर शासन निर्णयात देण्यात आलेल्या आहेत.

ऑलंम्पिक स्पर्धेमध्ये ज्या खेळा/क्रीडा प्रकाराचा समावेश असतो तेच खेळ/क्रीडा प्रकार खालील नमुद इतर स्पर्धांमध्ये आर्थिक सहाय्य् मिळण्यास अनुज्ञेय आहेत असे शासन निर्णयामध्ये नमुद आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) ऑलंम्पिक गेम्स् | 6) राष्ट्रकुल युवा स्पर्धा | 11) शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा |
| 2) विश्व् अंजिक्यपद स्पर्धा | 7) एशियन चॅम्पियनशिप | 12) पॅरा ऑलम्पिक स्पर्धा |
| 3) एशियन गेम्स् | 8) युथ ऑलम्पिक | 13) पॅरा एशियन गेम्स् |
| 4) राष्ट्रकुल स्पर्धा | 9) ज्यु. विश्व् अंजिक्य् पद स्पर्धा | 14) ज्युनिअर एशियन चॅम्पियनशिप |
| 5) एशियन कप | 10) वर्ल्ड कप | |

वरील स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी आर्थिक सहाय्यासाठी खेळाडूंची पात्रता निश्चित करण्याचे निकष खालीलप्रमाणे,

1) संबंधित खेळाडू मिरा भाईंदरचा रहिवासी असावा (5 वर्षे)

2) भारतीय शालेय खेळ महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्यावतीने अधिकृत राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही.

3) खेळाडू ज्या दिवशी पदक जिंकेल त्यावेळेस मिरा भाईंदरचा नागरीक असावा.

सन 2016-17 पासुन राष्ट्रीय शालेय, ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धेमध्ये मनपा क्षेत्रामधुन राज्याच्या संघातुन (सांघिक खेळ) सहभागी होणाऱ्या व प्राविण्य् मिळविणाऱ्या खेळाडूंना (वैयक्तिक खेळ) खालील प्रमाणे आर्थिक मदत देण्यात यावी.

| प्राविण्य् | राष्ट्रीय स्तर वैयक्तिक खेळ (रु.) | आंतरराष्ट्रीय स्तर वैयक्तिक खेळ (रु.) | राष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त् खेळाडू) (रु.) | आंतरराष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त् खेळाडू) (रु.) |
|---|---|---|---|---|
| आर्थिक मदत | 25,000/- | 50,000/- | 1,00,000/- | 2,00,000/- |

तरी वरील तक्यात नमुद खेळाप्रमाणे नोंदणीकृत संस्थेमार्फत राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर वैयक्तिक खेळाडूस तसेच राष्ट्रीय स्तर सांघिक खेळ (5 पेक्षा जास्त् खेळाडू) व आंतरराष्ट्रीय स्तर सांघिक (5 पेक्षा जास्त् खेळाडू) यामध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना वरील तक्यात नमुद प्रमाणे आर्थिक मदत करणेस तसेच गिनेश बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड तसेच या सारखेच रेकॉर्ड करणाऱ्या स्पर्धकांना प्रत्येकी रु.25,000/- प्रमाणे आर्थिक मदत करणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त**
**क्रीडा विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. 07/03/2022 4:10 PM
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ....62....... वर्ष :-...2021-22

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.२९/४ /2022.**

**सार्व. आरोग्य विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण :- ११ मनपा. मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई कामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणे कामाची निविदा मागविणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय व प्रभाग कार्यालय इमारती मध्ये दैनंदिन साफसफाईचे कामी निविदा प्रक्रिया करून हाऊस किपिंग संस्थेमार्फत साफसफाई राखली जात आहे. सदर कामी हाऊस किपिंग संस्थेस दिलेल्या कार्यादेशाची मुदत दि. 06/06/2022 रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे सदर कामासाठी नव्याने निविदा मागवून दर निश्चित करणे आवश्यक आहे. सदर हाऊस किपिंग संस्थेमार्फत मुख्य कार्यालय व 06 प्रभाग कार्यालयाची साफसफाई करणेकामी 34 कंत्राटी कामगार नेमणे कामी अंदाजीत वार्षिक खर्च रु. 1,55,00,000/- अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे कामाची कामाच्या निविदा प्रक्रिया पुर्ण करणे व याकामी येणारा खर्च सन 2022-23 या आर्थिक वर्षातील अर्थसकल्पिय अंदाजपत्रकातील मनपा. सार्व.इमारती व प्रभाग कार्यालय क्र. 1 ते 6 इमारती देखभाल व साफसफाई (आरोग्य) या लेखाशिर्षाखाली तरतुदीतून करण्यात येईल. तरी, मनपा. मुख्य कार्यालय इमारत व सर्व प्रभाग कार्यालय इमारती मधील दैनंदिन साफसफाई कामी हाऊस किपिंग एजन्सी नेमणे करीता निविदा मागवविणेकरीता मा. महासभची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

०११।५।२०२२

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

**(रवि पवार)**
**उप-आयुक्त (आरोग्य)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि. ११/०४/२०२२ वेळ दु १.०० वा
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ....०४....... वर्ष :- ...२०२२-२३

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**// गोषवारा //**

मा. महासभा दि. २९/७/२०२२

**प्रकरण क्रमांक (७२) :-** मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात पडणारे खड्डे Jet Patcher Pothole Patching Machine व्दारे बुजविणे कामाबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात मोठया प्रमाणावर पाऊस होत असतो. पावसाळयात विशेषत: भरतीच्या वेळी पाण्याचा निकास न झाल्याने रस्त्यावर पाणी साचुन खड्डे होत असतात. पावसाळी दिवसात सदर खड्डे हे खडीकरणाने भरुन बुजविण्यात येतात. तथापी डांबरीकरणाने सदर खड्डे बुजविता येत नाहीत. पावसाळयात पडणारे असे खड्डे कोल्डमिक्स व्दारे Jet patcher Pothole Patching Machine व्दारे बुजविता येणे शक्य आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात व खोदलेले रस्ते खड्डे बुजविण्यावर मोठया प्रमाणावर खर्च होत असते. सदर काम सन 2022-23 या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते दुरुस्ती या लेखाशिर्षातंर्गत करता येणार असुन सदर कोल्ड मिक्स डांबराने खड्डे बुजविणेसाठी अर्थ संकल्पात तरतुद करुन खर्चास मा. महासभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता घ्यावी लागणार आहे. तरी सदर प्रस्तावित तत्रज्ञांनाव्दारे काम करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करुन रु.5.00 कोटी खर्चास मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिलीप ढोले)
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-6/22-23/DK/MG-2

१

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२१ / ४ /2022

## मिळकत विभाग

## // गोषवारा //

प्रकरण क्रमांक (९३ ) :- रस्ते, चौक, वास्तू यांना नावे देणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक व वास्तु यांचे नामकरण करण्यासाठी खालील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रस्तावित नाव |
|---|---|---|
| 1) | पेणकरपाडा आरक्षण क्र.353 (उद्यान) | संत गजानन महाराज उद्यान |
| | | जिजामाता उद्यान |
| | | स्व. अरूण दिनकर पाटील उद्यान |
| | | भगवान गौतम बुध्द उद्यान |
| 2) | घोडबंदर बस डेपो | नाना शंकर शेट बस डेपो |
| 3) | मिरारोड (पुर्व) आरक्षण क्र.261 (उद्यान) | शिवरत्न वीर जिवाजी महाले उद्यान |
| 4) | शांती गार्डन सेक्टर 5 मधील आरक्षण क्र.336 मधील उद्यान | स्व.श्री दिलिप लाड नाना नानी पार्क |
| | | कै. यशवंत केशव भोईर उद्यान |
| 5) | मिरारोड (पु.) आरक्षण क्र.269 (उद्यान) | शहिद मेजर कौस्तुभ राणे उद्यान |
| | | सावित्री बाई ज्योतिराव फुले उद्यान |
| 6) | शांती पार्क गोकुल व्हीलेज रस्ता | श्री. भगवान महावीर स्वामी मार्ग |
| 7) | जरीमरी तलाव चौक | हिन्दु हृदय सम्राट पृथ्वीराज चौहान चौक |
| 8) | मिरारोड, पुनम सागर, परिवार हॉटेल समोरील चौक | विश्व धरोहर चौक |
| | | भारतरत्न लोहपुरुष सरदार वल्लभाई पटेल चौक |
| 9) | मिरारोड (पु.) आ.क्र.246 मैदान | छत्रपती संभाजी राजे मैदान |
| 10) | मिरारोड (पु.) हाटकेश गौरव संकल्प फेज-2 दुभाजक मधील विरंगुळा केंद्र | हाटकेश्वर महादेव कट्टा (जेष्ठ नागरीक विरंगुळा) |
| 11) | भाईंदर (पु.) आर.एन.पी. पार्क सरोवर इमारत ते बाबाजी पॅलेस पर्यंत रस्ता | श्री नारायण गुरु रोड |
| 12) | श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील पंजाब फ्राउड्री बस थांबा | सहयादी नगर बस थांबा |
| 13) | भाईंदर (पु.) सचिन तेंडुलकर मैदानातील रंगमंच | स्व. धर्मवीर आनंद दिघे रंगमंच |
| 14) | गोडदेव गाव, सामाजिक सभागृह | कै. विनायक धर्मण घरत सभागृह |
| | | स्व. श्री तुलशीदास म्हात्रे सभागृह |
| 15) | प्लीझंट पार्क खोडीयार कुंज जवळील उद्यान | प्लीझंट पार्क उद्यान |
| 16) | मिरारोड, कनकिया एल.आर.तिवारी इंजिनिअरींग व राहुल इंटरनॅशनल स्कुल मधील रस्ता | श्रीम कांतीदेवी एल. तिवारी मार्ग |
| 17) | रामदेव पार्क, लाईफ लाईन केमिस्ट समोरील चौक | भगवान महावीर चौक |
| 18) | हटकेश, मंगलनगर आरक्षण क्र.305 (उद्यान) | स्वतंत्रता सेनानी मंगल पांडे उद्यान |
| 19) | कनकिया आ.क्र.300, 267 चौक | मॉ भारती चौक |
| 20) | कनकीया चौक (अंतरीक्ष इमारती जवळ) | श्री. शनीधाम चौक |
| 21) | हटकेश, आ.क्र. 314 येथील चौक | भगवान गौतम बध्द चौक |

| | | |
|---|---|---|
| 22) | हटकेश आ.क्र.314 मैदान | भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर मैदान |
| 23) | हटकेश हबटाऊन, गंगासदन चौक | भगवान श्री. परशुराम चौक |
| 24) | आरक्षण क्र.305 चौक | सम्राट अशोक मोर्य चौक |
| 25) | हटकेश अॅव्हेन्यु बिल्डींग ते पुजा पार्क (जॉगर्स पार्क) | भगवान धर्मराज श्री. चित्रगुप्त जॉगर्स पार्क |
| 26) | पेणकरपाडा गाव व गणेश मंदिर रस्ता चौक | मराठा चौक |
| 27) | राई शिवनेरी चौक | कै. श्री. यशवंत मास्तर चौक |
| 28) | राईगांव मैदान येथील नविन व्यासपीठ | संत श्री. बालयोगी सदानंद महाराज व्यासपीठ |
| 29) | मिरारोड (पूर्व) नविन न्यायालय इमारत समोरील रस्ता | कै. दादासाहेब बी पाटील मार्ग उर्फ डी.बी. पाटील मार्ग |
| 30) | आरक्षण क्र.242 मधील श्री. जग वल्लभ सुरीश्वरजी महाराज उद्यानातील योगा केंद्रास | स्वामी विवेकानंद योग केंद्र |
| 31) | सुजाता शॉपिंग सेंटर जंक्शन भाजी मार्केट अशोक भवन बी.पी. रोड अद्योगिक वसहात गल्ली | स्व. चांदमल मितल चौक |
| 32) | राष्ट्रीय महामार्ग क्र.8 नीलकमल नाका, जनता व काशिगाव प्रवेशव्दार | भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग व माता रमाबाई आंबेडकर प्रवेश व्दार |
| 33) | आर.एन.पी.पार्क कृष्णा आंगण इमारतीचे बाजुस असलेले उद्यान | काशी विश्र्वनाथ उद्यान |
| 34) | जनता नगर रस्ता कब्रस्थान समोरील चौक | छत्रपती शिवाजी महाराज चौक |
| 35) | भारतरत्न सचिन तेंडुलकर मैदानातील जॉगींग ट्रॅक | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जॉगींग ट्रॅक |
| 36) | मिरारोड, सॅन्ड स्टोन इमारती जवळ प्रभाग क्र.13 मधील सर्व्हे नं.431 मधील उद्यान | युनिक गार्डन अव्दितीय उद्यान |
| 37) | भाईंदर (प.) स्वामी नारायण मंदीरा जवळील समाज मंदीर | श्री. हरिकृष्ण महाराज सभागृह |
| 38) | भाईंदर (प.) क्रांतीनगर समाज मंदिर | भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी ग्रंथालय |
| 39) | मिरारोड नयानगर ते शितल नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील चौक | स्व. श्रीमती उमा विश्वनाथ सपार चौक |
| 40) | भाईंदर (प.) गणेश आनंद नगर येथील उद्यान | गणेश आनंद क्रांती नगर उद्यान |
| 41) | मिरारोड (पूर्व) बालाजी हॉटेल स्कायलॅन्ड कॉम्पलेक्सच्या बाजूचे नियोजित जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र | स्व. यशवंत भोईर विरंगुळा केंद्र<br>संत शिरोमणी गाडगे महाराज विरंगुळा केंद्र |
| 42) | उत्तन भुतबंगला चौक | बॅरिस्टर काका बॅप्टिस्टा चौक |
| 43) | राष्ट्रीय महामार्ग क्र.08 वरून पेणकरपाडा कडे जाणाऱ्या रस्त्यावरील प्रवेशव्दार | कै. पदमाकर म्हात्रे प्रवेशव्दार |
| 44) | पेणकरपाडा येथील अग्निशमन केंद्र | डॉ. रामराव महाराज अग्निशमन केंद्र |
| 45) | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.108 या जागेवर विकसित होत असलेली मार्केट इमारत | स्वातंत्र्यसैनिक कै. आत्माराम राजाराम भोईर मंडई - |
| 46) | प्रभाग क्र.23 मधील मोर्वागांव येथील व्यायाम शाळेस | बालयोगी श्री. सदानंद महाराज व्यायाम शाळा |
| 47) | मौजे गोडदेव येथील विमलडेरी ते गोडदेव स्मशान मार्गापासून उत्तरेकडे जाणाऱ्या नवघर मैदान / गावाकडील रस्त्यास | श्री कलावती आई मार्ग |
| [illegible] | [illegible] | स्व. फलराजा बंशराज सिंह मार्ग |

| | | |
|---|---|---|
| | मार्ग | |
| 50) | प्रभाग क्र.03 मधील आर.एन.पी पार्क परिसरातील सरोवर इमारत ते बाबजी पॅलेस येथे जाणाऱ्या रस्त्यास | श्री. नारायण गुरु मार्ग |
| 51) | नगरभवन वाचनालयास | आगुस्तीन म. बांड्या कोळी वाचनालय |
| 52) | मिरागाव आरोग्य केंद्रास | पद्मश्री सिंधुताई सपकाळ आरोग्य केंद्र |
| 53) | भाईदर (पुर्व) प्रभाग क्र.10 मधील गॅस गोडाउन ते हनुमान मंदिर गल्लीमधील रस्त्यास | समाजसेवी उद्योजक स्व. फुलचंद रामबली यादव मार्ग |
| 54) | मिरारोड (पुर्व) काशिगाव सिल्वर सरिता येथील रस्त्यास | कै. भालचंद्र मोरेश्वर बांदवडकर (गुरूजी) मार्ग |
| 55) | जैसल पार्क या ठिकाणी जुनी पाण्याची टाकी तोडुन त्या जागेवर तळ +1 इमारतीस | भारतरत्न अब्दुल कलाम भवन<br>स्व.श्री. गोपिनाथ मंडे भवन<br>जोतिबाराव फुले भवन<br>अटलबिहारी वाजपेयी भवन<br>सावित्रीबाई फुले भवन |
| 56) | नवघर लोकमान्य टिळक सभागृहाच्या बाजूला असलेले योगा सेटर | डॉ. बाबा आमटे योगा सेंटर |
| | नवघर लोकमान्य टिळक सभागृहाच्या कंम्पाउंड मध्ये असलेले छोटे मैदान | संत गाडगे बाबा मैदान |
| 57) | मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.16 मधील आरक्षण क्र. 331,332,333 व 334 मधील रस्त्यास | कै. यशवंत भोईर मार्ग |
| 58) | प्रभाग क्र.11 मधील नवघर येथे मनपा मार्फत लताकुंज गल्लीस | कै. लता रामचंद्र पाटील मार्ग |
| 59) | प्रभाग क्र.14 मधील काशीमिरा वैष्णोदेवी मंदीरा लगत असलेल्या कम्युनिटी हॉल | माता जिजाऊ मंगल कार्यालय |
| | आरक्षण क्र.365 येथील नियाजित सभागृहास | माता रमाई आंबेडकर सभागृह |
| | आरक्षण क्र.360 येथील उद्यानास | क्रांतीज्योती सावित्रिबाई फुले उद्यान |
| | ग्रीन व्हिलेज येथे तयार होणाऱ्या चौकास | स्व. आनंद दिघे चौक |
| 60) | भाईदर (पुर्व) प्रभाग क्र.03 मधील आर.एन.पी पार्क येथील उद्यानास | काशीविश्वनाथ उद्यान<br>आर.एन.पी. पार्क उद्यान |
| 61) | मिरारोड (पूर्व) डेल्टागार्डनच्या बाजूला बांधत असलेल्या ॲमिनिटी स्पेसमधील इमारतीस | महाराष्ट्र भूषण पद्मविभूषण शिवशाहीर बाबा साहेब पुरंदरे भवन |
| 62) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड (60 फुटी रोड) वर बांधण्यात येत असलेल्या "स्पोर्ट कॉम्प्लेक्स" ह्या वास्तुस | कै. कृष्णराव गो. म्हात्रे क्रिडा संकुल |
| 63) | विजयपार्क येथील विरंगुळा केंद्रास | श्री स्वामी समर्थ विरंगुळा केंद्र |
| 64) | मिरा भाईदर महानगरपालिका, प्रभाग क्र.21 मिरारोड पूर्व, पुनम सागर कॉम्पलेक्स, कॅसाडेला समोरील, चौर रस्ता, सृष्टी ब्रिज जवळील चौकास | भारतरत्न स्वर्गीय अटलजी बिहारी वाजपेयी चौक |
| 65) | मिरा भाईदर महानगरपालिका, प्रभाग क्र.21 मिरारोड पूर्व, सृष्टी, कल्पतरू समोरील, तीन रस्ता जवळील चौकास | स्वर्गीय प्रमोद महाजन चौक |
| 66) | नवघर येथील रूपाली दर्शन ते सोलंकी पार्क पर्यंत गल्लीस | स्वर्गीय डॉ. मेघा दिलीप पाटील मार्ग |
| 67) | शनी मंदीर प्लेझंट पार्क शेजारी तयार होणाऱ्या रस्त्यास | श्री शनीश्वर मंदीर मार्ग |
| 68) | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.299 चार रस्ता पिना कोला बिल्डींग जवळील चौकास | कवियत्री स्व. डॉ. शाकुंतल पांडे चौक |

| | | |
|---|---|---|
| 69) | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.314 मधील समाज मंदिरास | बौध विहार समाजमंदीर |
| 70) | प्रभाग क्र.18 मधील आरक्षण क्र.314 समोरील चौकास | परमश्रध्देय गुरूदेव आचार्य श्री. महाश्रमणजी चौक |
| 71) | मिरा भाईंदर क्षेत्रातील वर्सोवा हॉटेल एक्सप्रेस ईन च्या आतुन हॉटेल सी ॲन्ड रॉक ते वर्सोवा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यास | राष्ट्रीय संत प. पु. आचार्य महाश्रमणजी मार्ग |
| 72) | प्रभाग क्र.15 मधील पांडुरंगवाडी येथील समाज मंदिरास | संत नरहरी महाराज समाज मंदिर |
| 73) | भाईंदर (पुर्व) गोडदेव गांव इंदिरा गांधी गार्डन येथील श्री संपदा इमारत ते उदयज्योती इमारती पर्यंत या रस्त्यास | स्व. कमलाकर अनंत म्हात्रे मार्ग |
| 74) | भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका, समाजसेविका, समाज सुधारक व क्रांतीज्यांती सावित्रीबाई फुले यांचे महिला भवनास | ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले भवन |

वरील प्रस्तावाचे अवलोकन करून अंतिम नामकरण होणेस शिफारस आहे.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-4/2021-22/DK/MG-7

गोषवारा प्राप्त दि. ११/३/२०२२ वेळ दु. २.४०वा.
मा. स्थायी समिती / मा. महासभा गोषवारा नोंद
रजिस्टर अ. क्र ...७३...... वर्ष :- 2021/22

लिपिक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२९/४/२०२२

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.९४ :- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रवासी तिकीट दर फेररचनेस मंजुरी देणे बाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा सन 2005 पासुन सूरू आहे. सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाकडे एकुण 74 बसचा ताफा उपलब्ध असून त्यामध्ये डिझेलवर चालणाऱ्या 59 टाटा स्टॅन्डेड, 10 टाटा मिडी व 05 वोल्वो एसी बसचा समावेश आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बस चालविणेसाठी सद्यस्थितीत तात्पुरत्या स्वरुपात Net Cost Contract (NCC) with Viable Gap Funding (VGF) तत्वावर बस ऑपरेटर म्हणून मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. यांची पुर्वीची बस ऑपरेटर यांचे मंजूर दरामध्ये व अटीशर्ती नुसार नियुक्ती केली असुन ते दि.03/02/2021 पासुन बससेवा चालवित आहेत. त्यानुसार बस ऑपरेटर यांना सध्या रु.28.20 प्र.कि.मी. दराने VGF ची रक्कम महानगरपालिकेकडून अदा करण्यात येत असून प्रवासी तिकीटांपासूनचे उत्पन्न बस ऑपरेटर यांना मिळत आहे. तसेच डिझेलचे दरातील तफावतीची रक्कम करारातील अटीशर्तीनुसार महानगरपालिकेकडून अदा करण्यात येत आहे. तसेच तिकीट दरवाढ केल्यानंतर VGF चे दर सुधारीत करण्याची तरतूद करारात आहे.

सद्यस्थितीत डिझेलचे दरामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली असून किमान वेतन, स्पेअर पार्टसचे दर इत्यादी दरामध्ये वाढ झालेली आहे. पुर्वीचे बस ऑपरेटर नियुक्तीसाठी 2019 मध्ये निविदा मागविली त्यावेळी निविदा सादर करण्याच्या अंतिम दि.13/05/2019 रोजी डिझेलचे दर रु.67.67 प्र.लिटर इतके होते व आज रोजी डिझेल दर रु.102/- ते रु.104/- प्र. लिटर इतके आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बससेवेसाठी मा. महासभा ठराव क्र.11 दि.19/05/2021 अन्वये गठीत समितीची मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली दि.08/09/2021 रोजी बैठकीमध्ये Net Cost Contract (NCC) with Viable Gap Funding (VGF) तत्वावर परिवहन सेवा चालविणेसाठी 6 वर्षे कालावधीकरीता निविदा काढावी, असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने निविदा प्रसिध्द केली असता, सदर निविदेसाठी दोन मुदतवाढी व फेरनिविदा प्रसिध्द केल्यानंतर देखील (2) दोनच निविदा प्राप्त झाल्या आहेत. तसेच दरम्यानचे कालावधीमध्ये नविन इलेक्ट्रीक बससाठी शासन अनुदान उपलब्ध झाल्याने व नविन बसची आवश्यकता, इलेक्ट्रीक बस खरेदी संदर्भात शासन निर्देश, उपलब्ध डिझेल बस इत्यादी बाबी विचारात घेऊन Gross Cost Contract (GCC) तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणे, तिकीट संकलन/ पर्यवेक्षण, देखरेख इत्यादीसाठी स्वतंत्र एजन्सी नेमणेसाठी धोरण निश्चित करणेकरीता मा.महासभेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

उक्त सर्व बाबी विचारात घेता व वाढलेले व भविष्यात वाढणारे खर्च विचारात घेता, परिवहन सेवा सुरळीत चालविणेसाठी प्रवासी तिकीटाचे दराबाबत विचार करणे आवश्यक आहे. सद्याचे प्रवासी तिकीटाचे सर्वसाधारण बसचे दर हे दि.19/09/2013 रोजी मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने मंजूर केलेले आहेत. तसेच वातानुकुलीत बसचे दर ऑगस्ट 2016 मध्ये मंजूर केलेले

आहेत. त्यानंतर कोणतीही प्रवासी तिकीट दरवाढ केलेली नाही. त्यामुळे परिवहन उपक्रमाचा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने प्रवासी तिकीटाचे दरामध्ये फेररचना करणे क्रमप्राप्त आहे.

मिरा भाईंदर शहरालगतच्या इतर संस्था जसे, ठाणे महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, वसई विरार महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे विद्यमान प्रवासी तिकीट दराची तुलना केली असता मिरा भाईंदर महानरगपालिका परिवहन उपक्रमाचे सर्वसाधारण बसचे प्रवासी तिकीट दर अत्यंत कमी आहेत व वातानुकुलीत बसचे दर थोडे जास्त आहेत. तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**वातानुकुलीत बसेस (तुलनात्मक तक्ता व प्रस्तावित दर)**

| कि.मी. | | मिरा भाईंदर महानगरपालिका प्रचलीत भाडे (ऑगस्ट 2016 पासुन) (रु.) | नवी मुंबई महानगरपालिका (दि.23/08/2021 पासुन) (रु.) | ठाणे महानगरपालिका (दि.17/07/2015 पासुन) (रु.) | मिरा भाईंदर महानगरपालिका प्रस्तावीत भाडे मागणी (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| पासुन | पर्यंत | | | | |
| 0 | 2 | 20.00 | 10.00 | 20.00 | 15.00 |
| 2 | 4 | 30.00 | 12.00 | 25.00 | 20.00 |
| 4 | 6 | 35.00 | 15.00 | 30.00 | 25.00 |
| 6 | 8 | 40.00 | 18.00 | 35.00 | 30.00 |
| 8 | 10 | 40.00 | 20.00 | 40.00 | 30.00 |
| 10 | 12 | 50.00 | 22.00 | 50.00 | 35.00 |
| 12 | 14 | 50.00 | 25.00 | 50.00 | 35.00 |
| 14 | 16 | 55.00 | 27.00 | 55.00 | 40.00 |
| 16 | 18 | 60.00 | 30.00 | 65.00 | 45.00 |
| 18 | 20 | 60.00 | 32.00 | 65.00 | 50.00 |
| 20 | 22 | 70.00 | 35.00 | 75.00 | 50.00 |
| 22 | 24 | 70.00 | 40.00 | 75.00 | 55.00 |
| 24 | 26 | 75.00 | 45.00 | 80.00 | 60.00 |
| 26 | 28 | 80.00 | 50.00 | 85.00 | 65.00 |
| 28 | 30 | 80.00 | 50.00 | 85.00 | 65.00 |
| 30 | 32 | 90.00 | 55.00 | 95.00 | 75.00 |
| 32 | 34 | 90.00 | 60.00 | 95.00 | 75.00 |
| 34 | 36 | 100.00 | 60.00 | 100.00 | 80.00 |
| 36 | 38 | 100.00 | 65.00 | 105.00 | 80.00 |
| 38 | 40 | 100.00 | 65.00 | 105.00 | 80.00 |

## सर्वसाधारण बसेस (तुलनात्मक तक्ता व प्रस्तावीत दर)

| कि.मी. | | मिरा भाईदर महानगरपालिका प्रचलीत भाडे (दि.13/09/2013 पासुन) (रु.) | ठाणे महानगरपालिका (दि.17/07/2015 पासुन) (रु.) | वसई विरार महानगरपालिका (दि.07/10/2021 पासुन) (रु.) | नवी मुंबई महानगरपालिका (दि.23/08/2021 पासुन) (रु.) | मिरा भाईदर महानगरपालिका प्रस्तावीत प्रौढ भाडे मागणी (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| पासुन | पर्यंत | | | | | |
| 0 | 2 | 6.00 | 7.00 | 10.00 | 7.00 | 10.00 |
| 2 | 4 | 8.00 | 10.00 | 10.00 | 9.00 | 10.00 |
| 4 | 6 | 11.00 | 13.00 | 15.00 | 11.00 | 15.00 |
| 6 | 8 | 13.00 | 15.00 | 20.00 | 13.00 | 15.00 |
| 8 | 10 | 15.00 | 17.00 | 20.00 | 15.00 | 20.00 |
| 10 | 12 | 17.00 | 21.00 | 25.00 | 17.00 | 20.00 |
| 12 | 14 | 18.00 | 21.00 | 25.00 | 19.00 | 20.00 |
| 14 | 16 | 19.00 | 22.00 | 25.00 | 21.00 | 25.00 |
| 16 | 18 | 20.00 | 23.00 | 25.00 | 23.00 | 25.00 |
| 18 | 20 | 21.00 | 23.00 | 30.00 | 25.00 | 25.00 |
| 20 | 22 | 22.00 | 25.00 | 30.00 | 27.00 | 30.00 |
| 22 | 24 | 23.00 | 25.00 | 35.00 | 29.00 | 30.00 |
| 24 | 26 | 24.00 | 26.00 | 35.00 | 31.00 | 30.00 |
| 26 | 28 | 25.00 | 30.00 | 40.00 | 33.00 | 35.00 |
| 28 | 30 | 26.00 | 30.00 | 40.00 | 35.00 | 35.00 |
| 30 | 32 | 28.00 | 33.00 | 45.00 | 37.00 | 35.00 |
| 32 | 34 | 29.00 | 33.00 | 45.00 | 39.00 | 40.00 |
| 34 | 36 | 30.00 | 33.00 | 45.00 | 41.00 | 40.00 |
| 36 | 38 | 31.00 | 36.00 | 45.00 | 43.00 | 40.00 |
| 38 | 40 | 32.00 | 36.00 | 50.00 | 45.00 | 45.00 |
| 40 | 42 | **** | **** | 50.00 | **** | 50.00 |
| 42 | 44 | **** | **** | 55.00 | **** | 55.00 |
| 44 | 46 | **** | **** | 55.00 | **** | 60.00 |
| 46 | 48 | **** | **** | 60.00 | **** | 60.00 |
| 48 | 50 | **** | **** | 60.00 | **** | 60.00 |

त्याचेप्रमाणे बस आरक्षण, छायाचित्रण यासाठी परिवहन उपक्रमाची सामुग्री यांचे भाडे आकारणीचे दर निश्चित करून बस, बसडेपो व इतर सामुग्री भाडेतत्वावर देणेचे धोरण निश्चित केल्यास परिवहन उपक्रमाचे उत्पन्न वाढ करणेस मदत होऊ शकेल.

त्याकरीता खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**1.0 बससेवेसाठी (MMRDA क्षेत्राकरीता) बस आरक्षण दर :-**

| अ.क्र | आरक्षण बस प्रकार | प्रति 200 कि.मी.करीता दर | किमान आकार पहिल्या 08 तासांसाठी | प्रति तास दर (किंवा त्याच्या अंश भागास) |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण बस | रु.9000/- | रु.9000/- | रु.900/- |
| **अ.क्र** | **आरक्षण बस प्रकार** | **प्रति 200 कि.मी.करीता दर** | **किमान आकार पहिल्या 08 तासांसाठी** | **प्रति तास दर (किंवा त्याच्या अंश भागास)** |
| 2 | मिडी/मिनी बस | रु.8000/- | रु.8000/- | रु.800/- |
| 3 | व्होल्वो वातानुकूलीत | रु.18000/- | रु.18000/- | रु.1800/- |

टिप :- 1) पोलीस दल, गृहरक्षक दल, शासकीय कामकाज, महापालिका कामकाज व महापालिकेच्या शाळा यांना उपरोक्त दरात 10% सवलत राहील.
2) चित्रपट, टि.व्ही. सिरियल शुटींग या साठी दरात 20% वाढ राहील.

2.0 सर्वसाधारणतः आरक्षणासाठी आणि चित्रपट व टि.व्ही सिरियलसाठी उपरोक्तप्रमाणे 8 तासापेक्षा अधिक तासासाठी प्रति तास दर नमूद केलेप्रमाणे आकारणी केली जाईल.

3.0 सर्वसाधारण: सर्व प्रकारच्या आरक्षणासाठी बस आगारामधून निघाल्याच्या वेळेपासून व आगारात येण्याच्या वेळेपर्यंतचा कालावधी अथवा कि.मी.याची गणना करण्यात येईल.

**4.0 चित्रीकरण (Shooting) करताना उपयोगात आणवयाच्या परिवहन उपक्रमाची सामुग्री करिता भाडे आकारणी:-**

| अ.क्र | सामुग्री | प्रतिदिन आकार सर्वसाधारण बस | प्रतिदिन आकार वातानुकूलीत बस |
|---|---|---|---|
| 1 | तिकिट बॉक्स/तिकिट मशिन (ETM) | रु.500.00 | रु.500.00 |
| 2 | कॅश बॅग (वाहकाची चामड्याची पिशवी) | रु.300.00 | रु.300.00 |
| 3 | बसमधील आसन काढणे प्रति आसन | रु.500.00 | रु.500.00 |
| 4 | वाहक/बिल्ला/पंच/इतर संकिर्ण बाबींसह कर्मचाऱ्याचा गणवेश | रु.1000.00 | रु.1000.00 |

**5.0 चित्रीकरणासाठी (Shooting) बसडेपो भाडे आकारणी :- प्रतिदिन आकार**

I. पहिल्या आठ तासांकरीता रु.25,000/-
II. प्रति तास दर रु.4,000/-

**6.0 सर्वसाधारण व वातानुकूलीत बससेवेकरीता नोंदवलेले आरक्षण रद्द करणे व लांबणीवर टाकणे.**

6.1 दोन दिवस अगोदर लेखी सुचना देऊन आरक्षण रद्द करणे / लांबणीवर टाकणे करीता आरक्षण दराच्या 10% दंड आकारणी करण्यात येईल.

6.2 एक दिवस अगोदर लेखी सुचना देऊन आरक्षण रद्द करणे / लांबणीवर टाकणे करीता आरक्षण दराच्या 25% दंड आकारणी करण्यात येईल.

6.3 एक दिवसापेक्षा कमी कालावधीत लेखी सुचना देऊन आरक्षण रद्द करणे / लांबणीवर टाकणे करीता आरक्षण दराच्या 35% दंड आकारणी करण्यात येईल.

**7.0 बस मागणी नोंदविणे :-**

7.1 बस मागणी नोंदविण्याकरिता अंदाजित संपूर्ण आकार अधिक 50% जादा आगाऊ रक्कम प्रदान करावयाची आहे. 50% जादा आगाऊ रक्कम कमी-जास्त करण्याचा अधिकार परिवहन व्यवस्थापकांना राहील. सामान्यत: कमीत कमी 03 दिवस अगोदर सूचना मिळाल्यावर बसगाड्या भाड्याने देण्यात येतील.

7.2 आरक्षण तत्वावर देण्यात आलेल्या कालावधीत बसेसचे होणारे नुकसान हे आरक्षण नोंदविणाऱ्यांकडून वसूल केले जाईल.

8.0 दैनंदिन बस संचलनसाठी बसेसची आवश्यकता पाहून आरक्षित बस देण्याचा अधिकार मा. परिवहन व्यवस्थापक यांचेकडे राहील.

तरी, उक्तप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या प्रस्तावित प्रवासी तिकीट दर फेररचना प्रस्ताव मुंबई प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचेकडे पाठविणेस मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

**(दिलीप ढोले)**
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका